जा.क्र./नसका/स्थायी/CR-76/2014.
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांकः- 04.09.2014

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.**

**स्थायी समितीच्या सभेची सूचना**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम** 1949 **चे अनुसूची ड चे प्रकरण** -2 **मधील नियम क्र.**3 **(अ) अन्वये**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूची ड चे प्रकरण दोन मधील नियम क्र 3 (अ) (ब) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा **दि.06.09.2014.रोजी स.11.00 वा.** नांवाशमनपा स्थायी समिती सभागृह येथे भरविण्यात येत आहे तरी या सभेस उपस्थित राहावे ही विनंती.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांवाशमनपा, नांदेड.

प्रति,
**श्री/श्रीमती** ________________________
सदस्य / सदस्या स्थायी समिती,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.

**कार्यक्रम पत्रिका**

**विषय क्र.1**

नांवाशमनपा आदेश क्र.आवि/औभां/10596/2014, दि.1.09.2014 अन्वये, नांवाशमनपाकेच्या सार्वजनिक दवाखान्यासाठी लागणारी औषधी व इतर साहित्य खरेदी करुन उपलब्ध करुन ठेवणे व आवश्यकतेनुसार दवाखान्यासाठी वेळोवेळी पुरवठा करणे आवश्यक आहे.

त्यानुसार सदरील औषधी केंद्र व राज्य दर करारावर असणा-या कंपन्या (1)हाफकिन अजिंठा फार्मासुटीकल्स लि.जळगाव (2) हाफकिन बायो-फार्मासुटीकल्स कार्पोरेशन लि.मुंबई (3) कर्नाटका एन्टीबायोटिक्स एन्ड फार्मासुटीकल्स लि.बैंगलोर (4) झीम लॅब्रोटरीज लि.नागपूर (5) हिमालया ड्रग्ज कंपनी बैंगलोर या उत्पादित करणा-या कंपन्या अथवा यांच्या अधिकृत पुरवठा धारकांकडून नियमाप्रमाणे रास्त दराने खरेदी करण्यासाठी लागणारी रक्कम रु.23,49,444/- (अक्षरी रुपये तेवीस लाख एकोनपन्नास हजार चारशे चौरेचाळीस फक्त) ला प्रशासकिय व आर्थिक मान्यता मुं.प्रा.म.न.पा. अधिनियम 1949 चे कलम 73 (क व ड अन्वये) देण्यात आली त्याची नोंद घेणे बाबत.

**विषय क्र.2**

जेएनएनयुआरएम अंतर्गत 1. रेल्वे स्टेशन ते बाफना टी पॉईंट व बाफना आरओबी ते महाराणा प्रताप चौक ते नमस्कार चौक 2. बाफना टी पॉईंट ते इदगाह कमान या रस्त्यावर ड्रेनेज लाईन टाकल्यामुळे सदरील रस्ते नादुरुस्त झालेले आहेत. सदरील रस्ते राज्य महामार्गाचे असून शहरातील मुख्य रहदारीचे तसेच अत्यंत महत्त्वाचे रस्ते आहेत. सदरील रस्ते ड्रेनेज लाईन टाकल्यामुळे नादुरुस्त झाल्याने सुलभ वाहतूकीसाठी खूप अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे सदरील रस्ते पावसाळयादरम्यान वाहतूकीस योग्य करणे व पुर्ववत करणे आवश्यक आहे. सदरील रस्त्याची निविदा प्रक्रिया हाती घेऊन कार्यारंभ आदेश देणेपर्यंत जवळपास 2/3 महिने कालावधी लागणार आहे. तसेच सदरील रस्ते पावसाळया दरम्यान दुरुस्त करुन वाहतुकीस सुरळीत करणेसाठी मा.खासदार, मा.आमदार, जिल्हा पोलिस प्रशासन व नागरिक यांची मागणी होत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कंत्राटदाराचे नाव | अंदाजित किंमत |
|---|---|---|---|
| 1. | 1. रेल्वे स्टेशन ते बाफना टी पॉईंट<br>2. बाफना आरओबी ते महाराणा प्रताप चौक ते नमस्कार चौक | मे. शारदा कंन्स. नांदेड. | रू.3,18,73,240/- |
| 2 | 1. बाफना टी पॉईंट ते इदगाह कमान | डी.एम. पाटील | रू.2,89,05,605/- |

सदरील कामे वरील कंत्राटदारांकडुन हाती घेण्यात आले असुन काम प्रगतीपथावर आहे. करिता सदरील कामासाठी जेएनएनयुआरएम अंतर्गत NAD-08 मधुन होणा-या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यतेस्तव सादर.

**<u>विषय क्र.3</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दित माळटेकडी उड्डाण पुलाच्या पोचमार्गाचे बांधकामात मनपा रस्ता क्रं 9 वरील विद्युत वाहिनी मुळे अडथळा निर्माण होत असल्यामुळे सदरील विद्युत वाहिनी मनपा के कडून तातडीने स्थलांतरीत करणेसाठी महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाने या कामासाठी अंदाजपत्रकानुसार लागणारा निधी रु.1180827/- मनपा केस वर्ग करुन कळविले आले असता सदरील काम विना निविदा अंदाजपत्रक दरानुसार रास्त पध्दतीने नोंदणीकृत अ वर्ग विद्युत कंत्राटदार मे.श्रध्दा इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग कंपनी नांदेड यांच्याकडून करुन घेण्यात येत आहे. या कामासाठी मे.श्रध्दा इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग कंपनी नांदेड यांनी प्रथम धावते देयक रु.380505/- सादर केले असून सदरील देयकाची नोंद या कामावर देखरेख व नियंत्रण करणारे कनिष्ट अभियंता (विद्युत) श्री सय्यद यूनूस यांनी मोजमाप पुस्तिका क्रं 479 मध्ये पान क्रं 41 ते 44 वर नोंद घेतलेली आहे. तरी या कामासाठी प्रथम धावते देयकानुसार झालेला खर्च रु.380505/- (अक्षरी रु.तिन लाख ऐंशी हजार पाचशे पाच फक्त) साठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनूसूची (ड) प्रकरण (5) कलम (2) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर

**<u>विषय क्र.4</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दित झोन क्रमांक 3 अंतर्गत प्रभाग क्रं 27 अ मध्ये 25 नग 70w सोडियम पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहे. सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम(विद्युत विभागाच्या) डी.एस.आर. 2011-12 नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर मे.नांदेड इंजिनिअरिंग कंपणी नांदेड यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी रु.89475/- (अक्षरी रु.एकोननव्वद हजार चारशे पंचेहात्तर फक्त) एवढा खर्च झालेला आहे. करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनूसूची (ड) प्रकरण (5) कलम (2) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर

**<u>विषय क्र.5</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दित प्रभाग क्रं 4 मध्ये जानकी नगर (नभांगण सोसायटी) परिसरात 2 पोल उभारुन एकूण (17) नग सार्वजनिक पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहे.सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम(विद्युत विभागाच्या) डी.एस.आर. 2011-12 नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर श्री नांदेड इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी रु.93000/- (अक्षरी रु.त्रेअन्नव हजार फक्त) एवढा खर्च झालेला आहे. करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनूसूची (ड) प्रकरण (5) कलम (2) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर

**<u>विषय क्र.6</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दित झोन क्रमांक 3 अंतर्गत प्रभाग क्रं 30 मध्ये भोई गल्ली येथे एल.टी.पोल उभारण्यात आले आहे.सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम(विद्युत विभागाच्या) डी.एस.आर. 2011-12 नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर मे.नांदेड इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी रु.82869/- (अक्षरी रु. बेअंशी हजार आठशे एकोनसत्तर फक्त) एवढा खर्च झालेला आहे. करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनूसूची (ड) प्रकरण (5) कलम (2) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर

**<u>विषय क्र.7</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दित झोन क्रं 2 अंतर्गत विद्युत नगर येथील हनुमान मंदिर समोर एक जुना टयूबूलार पोल उभारुन 5 नग 4x24 व्हॅट टी-5 पथदिवे व भाग्यनगर येथील मोकळया जागेत एक जुना टयूबूलार पोल उभारुन जुने (4) पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहे.सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभागाच्या) डी.एस.आर. 2011-12 नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर श्री व्यंकटेश्वरा इलेक्ट्रीकल्स ॲन्ड वर्क्स नांदेड यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी रु.56182/- (अक्षरी रु. छप्पन हजार एकशे बेअंशी फक्त) एवढा खर्च झालेला आहे. करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनूसूची (ड) प्रकरण (5) कलम (2) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर

**<u>विषय क्र.8</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दित प्रभाग क्रं 34 मध्ये गाडीपुरा भागात विविध ठिकाणी नवीन (25) नग 70w सोडियम पथदिवे पुरवठा करुन बसविण्यात आले आहे. सदरील काम अत्यंत तातडीने करुन द्यावयाचे असल्याने निविदा न मागविता महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम (विद्युत विभागाच्या) डी.एस.आर. 2011-12 नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रक दरावर श्री नांदेड इलेक्ट्रीकल इंजिनिअर्स नांदेड यांच्याकडून रास्त पध्दतीने करुन घेण्यात आलेली आहे व या कामासाठी रु.86300/- (अक्षरी रु. शहाऐंशी हजार तिनशे फक्त) एवढा खर्च झालेला आहे. करिता या कामास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 च्या अनूसूची (ड) प्रकरण (5) कलम (2) अन्वये कार्योत्तर प्रशासकीय व आर्थिक मान्यता प्रदान करणेसाठी प्रस्ताव सादर

**<u>विषय क्र.9</u>** **<u>प्रस्ताव</u>**

नांवाशमनपाकेत सिव्हील स्ट्रक्चरल इंजिनिअर पॅनेलवर घेण्यासाठी श्री खाजा मोइनोद्दीन इनामदार, यांनी मा.आयुक्त, मा.महापौर, मा.सभापती (स्थायी समिती) यांचेकडे विनंती अर्ज सादर केलेला असून ते बी.ई. सिव्हील व एम.ई. स्ट्रक्चरल चे पदवीधर असल्यामुळे त्यांना महानगरपालिकेच्या सिव्हील स्ट्रक्चरल इंजिनिअर पॅनेलवर घेण्याची प्रशासकिय मान्यता देणेबाबत.

**सुचकः-** गफ्फार खॉन गुलाम महंमद खॉन. **अनुमोदकः-** गिल सरजितसिंघ पंजाबसिंघ.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांवाशमनपा, नांदेड.